MHDH010035642021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०५.१२.२०२३ |
| नोंदणी तारीख | : | ०५.१२.२०२३ |
| निकाल तारीख | : | १६.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०४व.०३म.११दि |

**धुळे येथील अतिरिक्त तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी - एस.जे. गायकवाड)**

**विशेष खटला क्र. २२४/२०२३**
**नि.क्र.४०/ए**

| |
|---|
| गुन्हा रजिष्टर क्र. ३५३/२०२२, पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन, ता. जि. धुळे. |

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत- प्रशांत उत्तमराव कलोरे,<br>वय – ५० वर्षे,<br>व्यवसाय – नोकरी,<br>रा. म.रा.वि.वि.कं. मर्या. ३३/११ के.व्ही. नकाणे सब स्टेशन, साक्री राड, धुळे. |

| | | |
|---|---|---|
| प्रतिनिधित्व | : | श्री. व्ही. एस. पुरोहित, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता. |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | : | सुनिल मन्साराम शेवाळे,<br>वय — ४८ वर्षे, व्यवसाय — शेतीकाम,<br>रा. प्लॉट नं. २०४, सत्य साईबाबा कॉलनी, साक्री रोड, धुळे |

| | | |
|---|---|---|
| प्रतिनिधित्व | : | आरोपीतर्फे ॲड. श्री. आर.बी. गुजर. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०६.१०.२०२२ |
| खबर/फिर्याद नोंदणीची दिनांक | : | ०७.१२.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | १६.०८.२०२३ |
| दोष ठेवण्याचा दिनांक | : | १७.१०.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | २७.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्यात आल्याचा दिनांक | : | ००.००.०००० |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १६.०३.२०२६ |
| शिक्षा ठोठावण्याचे आदेशाचा दिनांक/जर काही | : | - |

**आरो**पीचा **तपशीलः**

| किती आरोपी | आरोपीचा नांव | अटक केल्याचे दिनांक | सोडल्याचे दिनांक | ठेवलेले आरोप | निर्दोष असो व दोषी | ठोठावलेली शिक्षा | संपरीक्षा चालु असतांना आरोपींना स्थानबध्द करुन ठेवल्याचा कालावधी - फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल मन्साराम शेवाळे | -- | -- | भारतीय विद्युत अधिनियम (सुधारणा) २००३ चे कलम १३५ प्रमाणे | निर्दोष मुक्त करण्यात आले. | निर्दोष मुक्त करण्यात आले. | - |

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी.

**अ. अभियोगपक्ष**

| | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | प्रशांत उत्तमराव कलोरे | फिर्यादी |
| साक्षीदार क्र.२ | मनोज मधुकर जोशी | साक्षीदार |
| साक्षीदार क्र.३ | रुपेश बब्रुवान मनिखेडकर | तपासणी अधिकारी |

बचावपक्षाचे साक्षीदार - नाही.

न्यायालयीन साक्षीदार - नाही.

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी -

अ. अभियोगपक्ष

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | २४ | घटनास्थळ/जप्ती पंचनामा |
| २ | २५ | मिटरखोल पंचनामा |
| ३ | २६ | स्पॉट निरीक्षण अहवाल |
| ४ | २७ | मिटर तपासणी अहवाल |
| ५ | २८ | असेसेमेंट शीट |
| ६ | २९ | मिटर चाचणी अहवालाकरीता पाठविलेले पत्र |
| ७ | ३० | मिटर तपासणी करीता हजर राहण्याचे पत्र |
| ८ | ३१ | फिर्याद |
| ९ | ३५ | तपासाचा आदेश |
| १० | ३६ | फौजदारी व्यवहार संहिता कलम ४१ नुसारची नोटीस |
| ११ | ३७ | फौजदारी व्यवहार संहिता कलम ४१ नुसारची समज |

ब. बचावपक्ष - निशाणी - काही नाही.

क. न्यायालयातर्फे - निशाणी -

| अ.क्र. | न्यायालयातर्फे नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ३८ | अभियोगपक्षातर्फे पुरावा बंद पुर्सिस |

| | | |
|---|---|---|
| २ | ३९ | आरोपीचा फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे नोंदवण्यात आलेले जबाब |

ड. सामग्री वस्तुः

| अ.क्र. | वस्तु क्र. | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

## न्या य नि र्ण य
( दिनांक १६ मार्च, २०२६ )

आरोपी हा भारतीय विद्युत कायदा कलम १३५ चे गुन्हयाच्या चौकशीस सामोरे जात आहे.

२. सरकार पक्षाच्या खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी प्रशांत उत्तमराव कलोरे हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, धुळे येथे भरारी पथकात अतिरीक्त कार्यकारी अभियंता म्हणुन कार्यरत असुन भरारी पथकात त्यांचे सोबत सहायक अभियंता साजिद तडवी, सहायक दक्षता अधिकारी मनोज जोशी, उच्च स्तरीय लिपीक अनिल बागुल व वरिष्ठ तंत्रज्ञ सुभाष माळी हे कार्यरत होते. दि. ०६.१०.२०२२ रोजी फिर्यादी प्रशांत उत्तरमराव कलोरे हे त्यांचे भरारी पथकातील सहका-यांसह साईबाबा कॉलनी, महिंदळे शिवार, साक्री रोड, ता.जि. धुळे येथील विज कनेक्शन धारक किशोर दिगंबर माळी व विज वापरदार सुनिल मंन्साराम शेवळे यांचे सिंगल फेज घरगुती वापराचे विज कनेक्शनची तपासणी केली असता, त्याचा ग्राहक क्र. ०८००१०४८८२२६ मंजूर भार ०.७८ कि.वॅट, जिनस कंपनीचे मिटर पी नं. ९०३८५७८ क्षमता ५.३० ॲम्पीयर असुन त्यावरील रिडींग २४७९ के.डब्लु.एच. असे होते. त्यांचे असे निदर्शनास आले की, सदर मिटरचे सिल व मिटर हाताळलेले व संशयास्पद स्थितीत होते. तेंव्हा सदरची बाब त्यांनी उपस्थित ग्राहक प्रतिनिधीच्या निदर्शनास आणुन दिली. तसेच, सदर ग्राहकास दि. ०६.१०.२०२२ रोजी लेखी सुचना देवुन मिटरच्या सखोल तपासणीकामी हजर राहणेबाबत समज दिली. परंतु, सदर ग्राहकास भ्रमध्वनीव्दारे संपर्क साधुन देखील ते मिटरच्या सखोल तपासणी कामी हजर झाले नाहीत. तेंव्हा त्यांनी उपस्थित पंचासमक्ष विज मिटरची तपासणी केली असता, सदर मिटर हे पारदर्शक असल्यामुळे मिटरच्या आतील इनकमिंग कॉपर पट्टीवरील पिवळया रंगाची वायर कट करुन इतर ठिकाणी रेशोलिंग केल्याचे दिसुन आले. त्याचप्रमाणे न्युट्रल सिटीची काळया रंगाची वायर मधोमध कट केल्याचे दिसली. वीज ग्राहकाने वरील केलेल्या तांत्रीक फेरबदलामुळे सदर मिटरची मुळ रचना बदललेली दिसुन आली. परिणामी मिटर हे संथ व हळुवार गतीने विजेची नोंदणी करीत असल्याचे दिसुन

आले. अशा प्रकारे किशोर दिंगबर माळी व विज वापरदार सुनिल मन्साराम शेवाळे यांनी संगनमताने मिटरच्या मुळ रचनेत फेरफार करुन योग्य विज वापराची नोंद मिटरमध्ये होणार नाही, अशी व्यवस्था विज चोरीच्या व लबाडीच्या उद्देशाने घटनेच्या ०४ महिन्यापासुन करुन ०.७१० किलो वॅट एवढया लोडभार वर महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमीटेड चे ३०७० युनिटची रक्कम रु. ८५,०७०/- ची विज चोरुन वापरल्यामुळे त्यांनी आरोपी विरोधात फिर्याद दिलेवरुन आरोपी विरोधात पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३५३/२०२२ ची नोंद होवुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस नाईक आर.बी. मनिखेडकर, तपास अधिकारी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. आरोपीस फौजदारी व्यवहार संहिता कलम ४१अ नुसार समज तसेच ४१अ/१ नुसार न्यायालयात हजर राहण्याची नोटीस दिली, फिर्यादी प्रशांत उत्तमराव कलोरे यांनी त्यांचे भरारी पथकाने आरोपीचे विद्युत कनेक्शन तपासणीच्या वेळेस तयार केलेली कागदपत्रे प्राप्त केली व तपासाअंती आरोपी विरोधात वरील गुन्हयांतर्गत आरोपपत्र सादर केले.

३. मी आरोपी विरोधात नि.क्र. १५ वर आरोप निश्चित करुन त्यातील मजकुर आरोपीस समजावुन सांगीतला असता, आरोपीने गुन्हा नाकबुल करुन गुन्हयाच्या चौकशीस सामोरे जाण्याचे ठरविले.

४. सरकारपक्षाच्या खटल्याच्या हकीकतीवरुन चर्चेकरीता खालील मुद्दे उपस्थीत झालेले असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. ०६.१२.२०२२ रोजी १२.३० वाजेच्या सुमारास आरोपीने त्याचे राहते घरी सत्य साईबाबा कॉलनी, महिंदळे शिवार, साक्री रोड, धुळे येथील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे ग्राहक क्र. ०८००१०४८८२२६ मिटर क्र. ९०३८५७८ मंजूर भार ०.७८ कि.वॅट, क्षमता ५.३० ॲम्पीयर चे मिटर रचनेत फेरफार करुन विज चोरीच्या व लबाडीच्या उद्देशाने मिटर | |

| | | |
|---|---|---|
| | मध्ये व्यवस्था करुन महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनी लिमीटेडचे ३०७० युनिटची रक्कम रु. ८५,०७०/- ची विज चोरी केल्याचे सरकार पक्ष शाबीत करते काय ? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **....अंतीम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

५. आरोपीविरुध्द चा गुन्हा शाबीत करण्यासाठी सरकार पक्षाने खालीलप्रमाणे साक्षीदार तपासले आहेत.

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | नि.क्र. | कारण | कागदपत्र | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| सा.क्र. १ | प्रशांत उत्तमराव कलोरे | २३ | फिर्यादी | घटनास्थळ/ जप्ती पंचनामा, मिटर खोल पंचनामा, स्पॉट निरीक्षण अहवाल, मिटर पथक प्रमुखाच्या ताब्यात दिल्याचा अहवाल, वीज चोरी असेसमेंट शीट, मिटर चाचणी करीता पाठविलेल्या पत्राची प्रत, आरोपीस विज मिटरचे तपासणी करीता हजर राहण्याचे पत्र, असेसमेंट शीट व वीज चोरी बील नि.क्र. २४ ते ३१ | पुरक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | मनोज मधुकर जोशी | ३३ | साक्षीदार | ... | पुरक |
| ३. | रुपेश बब्रुवान मनिखेडकर | ३४ | तपास अधिकारी | गुन्हयाचा तपासाबाबत आदेश, आरोपीस फौजदारी व्यवहार संहिता कलम ४१अ नुसार दिलेले समज व कलम ४१अ/१ नुसार दिलेली नोटीस प्रत नि.क्र. ३५ ते ३७ | पुरक |

६. नि.क्र. ३८ वर सरकार पक्षाने पुरावा बंद पुरशीस सादर केली. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ व २ करीता**

७. वरील दोंन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याकारणाने चर्चेची पुर्नावृत्ती टाळण्याच्या उद्देशाने वरील दोंन्ही मुद्दे चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात आले. प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी यांचे जबाबात असे आले आहे की, सन २०२१ ते २०२४ दरम्यान ते महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, धुळे येथे भरारी पथकात अतिरीक्त कार्यकारी अभियंता म्हणुन कार्यरत असतांना त्यांचे सोबत सदर पथकात सहायक अभियंता साजिद तडवी, सहायक दक्षता अधिकारी मनोज जोशी व वरिष्ठ तंत्रज्ञ सुभाष माळी हे होते. दि. ०६.१०.२०२२ रोजी ते त्यांचे भरारी पथकातील कर्मचा—यासह महिंदळे शिवार, साक्री रोड, ता.जि. धुळे येथील विज कनेक्शन नामे किशोर दिगंबर माळी व विज वापरदार सुनिल मंसाराम शेवाळे यांचे सिंगल फेज घरगुती विज पुरवठा वापराची तपासणी केली असता, त्याचा मंजूर भार ०.७८ कि.वॅट घरगुती वापराचे तसेच जिनस कंपनीचे मिटर

होते. त्याची क्षमता ५.३० ॲम्पीयर असुन त्यावरील रिडींग २४३९ कि.वॅट इतके दिसत होते. सदर मिटरचे सिल व मिटर हाताळलेले व संशयास्पद दिसत होते. म्हणुन त्यांनी सदरची बाब उपस्थित ग्राहकाच्या प्रतिनिधीच्या निदर्शनास आणुन दिली.

८. प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, त्यांनी सदरचे मिटर तपासणीकरीता कार्यशाळेत पाठविले असता, संबंधीत तपासणीदाराने त्यांना अभिप्राय दिला की, मिटर मधील कॉपर पट्टी मधील पिवळी वायर ही इतर ठिकाणी जोडलेली, न्युट्रल सिटीची काळया रंगाची वायर मधोमध कट केलेली व सदरचे मिटर टॅंपर केलेले होते.

९. प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, नि.क्र. २४ प्रमाणे घटनास्थळी पंचांसमक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनाम्यासह मिटर जप्त केले, नि.क्र. २५ प्रमाणे विज मिटर खोल पंचनामा तयार केला, नि.क्र. २६ प्रमाणे स्पॉट निरीक्षण अहवाल तयार केला, नि.क्र. २७ चे अहवालानुसार मिटर पथक प्रमुखाच्या ताब्यात दिले. नि.क्र. २८ प्रमाणे विज चोरी बाबतचे असेसमेंट शीट तयार केले, नि.क्र. २९ चे पत्राप्रमाणे मिटर चाचणी करुन तपासणी अहवाल मिळणेकरीता पाठविले, नि.क्र. ३० चे पत्राप्रमाणे आरोपीस विज मिटरचे सखोल तपासणीकामी हजर राहण्याची समज दिली व नि.क्र. ३१ प्रमाणे आरोपी विरोधात पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. अशा प्रकारे प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी यांचे जबाबातुन सरकार पक्षाने नि.क्र. २४ ते नि.क्र. ३१ वर असलेल्या कागदपत्रातील मजकुर शाबीत करण्याचा प्रयत्न केला असुन आरोपीचे वतीने प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी यांचा उलटतपास घेण्यात आला.

१०. प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी यांनी उलटतपासात कबुल केले की, आरोपीने विज चोरीबाबत दिलेले बिल, जोडणी चार्ज व तडजोडीची रक्कम जमा केल्यास

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड व आरोपी दरम्यान तडजोड होते. पुढे त्यांनी कबुल केले की, सध्या त्यांची आरोपी विरोधात काहीही तक्रार राहिलेली नाही.

११. मनोज जोशी (सा.क्र. २) यांचे जबाबात असे आले आहे की, दि. ०६.१०.२०२२ रोजी भरारी पथकातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांसोबत ते महिंदळे शिवार, साक्री रोड, धुळे येथे विज वापराची तपासणी करीता गेलेले होते. तेथे त्यांनी विज वापरदार माळी यांचे घरी गेले तेंव्हा वरिष्ठ तंत्रज्ञ सुभाष माळी यांनी विज धारकाचे विज मिटरची तपासणी करुन पथक प्रमुख प्रशांत कलोरे यांना माहिती दिली की, सदर मिटरमध्ये फेरफार केला गेलेला आहे. तेंव्हा सदरचे मिटर त्या जागेवरुन काढुन त्यांची सखोल तपासणी करण्यात आली. सदरची तपासणी करण्यापुर्वी हजर असलेल्या इसमास लेखी पत्र देवुन सखोल तपासणी कामी हजर राहण्याची समज देण्यात आली होती. त्यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, सदर विज वापर धारकाने विद्युत मिटरमध्ये छेडछाड केली असल्यामुळे पथक प्रमुख प्रशांत कलोरे यांनी आरोपीचे विरोधात फिर्याद दाखल केली. अशा प्रकारे सदर साक्षीदाराच्या जबाबातुन सरकार पक्षाने दि. ०६.१०.२०२२ रोजी भरारी पथकातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी विज वापरदार माळी यांचे विज मिटरची तपासणी केली, त्यात विज वापर धारकाने विद्युत मिटरमध्ये छेडछाड केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे पथकप्रमुख प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी यांनी आरोपी विरोधात फिर्याद दिल्याची बाब अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केला. आरोपीचे वतीने त्यांचा उलटतपास घेण्यात आला.

१२. मनोज जोशी (सा.क्र. २) यांनी त्यांचे उलटतपासात कबुल केले की, विद्युत तंत्रज्ञ सुभाष माळी यांना मिटरमध्ये छेडछाड केल्याचा संशय आलेला होता म्हणुन त्यांनी सदर विद्युत मिटर तपासणी करीता काढलेले होते. त्यांनी पुढे कबुल केले की आरोपीने तडजोडीची तसेच विज चोरी बिलाची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड जमा केलेली असुन सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमीटेड

ची आरोपी विरोधात काहीही तक्रार राहिलेली नाही. या व्यतिरीक्त सदर साक्षीदाराचे उलटतपासातुन कोणत्याही विसंगती अभिलेखावर आलेल्या नाहीत.

१३. रुपेश मनिखेडकर (सा.क्र. ३) तपास अधिकारी यांनी तपासाकामी ज्या औपचारीकता पुर्ण केल्या त्याबाबत जबाब दिलेला असुन त्याचे जबाबात असे आले आहे की, दि. ०७.१२.२०२२ रोजी ते धुळे शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणुन कार्यरत असतांना गु.र.नं. ३५३/२०२२ चा तपास नि.क्र. ३५ वर असलेल्या आदेशानुसार त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले व आरोपीस न्यायालयात हजर राहणेबाबत फौजदारी व्यवहार संहिता कलम ४१अ नुसार नि.क्र. ३६ व नि.क्र. ३७ वर असलेली नोटीस तसेच समज दिली. अशा प्रकारे सदर साक्षीदाराचे जबाबातुन सरकार पक्षाने नि.क्र. ३५ ते ३७ वर असलेल्या कागदपत्रातील मजकुर शाबीत करण्याचा प्रयत्न केलेला असुन आरोपीचे वतीने त्यांचा उलटतपास घेण्यात आला.

१४. रुपेश मनिखेडकर (सा.क्र. ३) तपास अधिकारी यांचे उलटतपासात त्यांनी कबुल केले की, प्रशांत कलोरे यांनी जी फिर्याद दाखल केली त्या अनुषंगाने त्याने गुन्हयाचा तपास केला. त्यांनी पुढे कबुल केले की, याकामी त्यांनी त्रयस्त साक्षीदारांचा जबाब नोंदविलेला नाही, तसेच साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविण्या व्यतिरीक्त त्यांनी याकामी दुसरे काहीही केलेले नाही. या व्यतिरीक्त सदर साक्षीदाराच्या उलटतपासातुन अभिलेखावर काहीही आलेले नाही.

१५. अशा प्रकारे सरकार पक्षाने सादर केलेल्या संपुर्ण पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता, प्रशांत कलोरे (सा.क्र. १), मनोज जोशी (सा.क्र. २) व रुपेश मनिखेडकर (सा.क्र. ३) यांचे जबाबातुन सरकार पक्षाने आरोपी सुनिल मंसाराम शेवाळे यांनी त्यांचे घरगुती विज वापराचे विद्युत कनेक्शन ग्राहक क्र. ०८००१०४८८२२६

मिटर क्र. ९०३८५७८ या मिटरच्या मुळ रचनेत फेरफार करुन योग्य विज वापराची नोंद मिटरमध्ये होणार नाही अशी व्यवस्था करुन ३०७० युनिटची रक्कम रु. ८५,०७०/– ची विज चोरुन वापरल्याची बाब शाबीत करण्याचा प्रयत्न केला असुन, सदर साक्षीदाराच्या जबाबाशी पुरक व सुसंगत असा ठोस पुरावा तसेच त्रयस्त साक्षीदारांचा पुरावा याकामी सरकार पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. याउलट, प्रशांत कलोरे (सा.क्र. १) फिर्यादी व मनोज जोशी (सा.क्र. २) यांनी त्यांचे उलटतपासात कबुल केले की, आरोपी यांनी विज चोरी बिलाची तसेच तडजोडीची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे जमा केलेली आहे, तेंव्हा सध्या आरोपी विरोधात त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही. याबाबीचा विचार केल्यास माझ्या मते सरकार पक्षाने आरोपी विरुध्दचा गुन्हा सर्व शंकेपलिकडे जावुन शाबीत केलेला नाही. तेंव्हा आरोपी प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारात्क देत आहे व मुद्दा क्र. २ च्या निष्कार्षाकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी सुनिल मंसाराम शेवाळे यांची भारतीय विद्युत कायदा (सुधारीत), २००३ चे कलम १३५ चे गुन्हयातुन फौजदारी व्यवहार संहितेचे कलम २३५ (१) चे तुरतुदीनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीने दिलेला जामीन कदबा व व्यक्तीगत जाच मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने फौजदारी व्यवहार संहितेचे कलम ४३७अ नुसार वरिष्ठ न्यायालयात अपिल झाल्यास हजर राहणे कामी रक्कम रु. १५,०००/- चा जामीन कदबा व व्यक्तीगत जाच मुचलका सादर करावा.

(वरील न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).

SHRIHARI JANARDAN GAIKWAD

Digitally signed by SHRIHARI JANARDAN GAIKWAD
Date: 2026.03.16 17:52:24 +0530

दिनांक - १६.०३.२०२६

(एस.जे. गायकवाड)
अतिरीक्त सत्र न्यायाधीश, धुळे

Dictated on : 16/03/2026
Transcribed on : 16/03/2026
Checked on : 16/03/2026
Retyped : 16/03/2026
Signed on : 16/03/2026

**<u>दाखला</u>**

दाखला देण्यात येतो की, पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : संजय एच. पाटील |
| न्यायालयाचे नाव | : तदर्थ जिल्हा न्यायाधिश–१ तथा अति. सत्र न्यायाधीश, धुळे यांचे न्यायालय. |
| पीडीएफ अपलोड केल्याचा दिनांक | : १६.०३.२०२६ |

सही/–

लघुलेखक